# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१८ – १९

## राष्ट्रीय सेवा योजना विभाग

सकाळ
रविवार, ३० डिसेंबर २०१८ | ५

# विद्यार्थ्यांनी ग्रामविकासात भाग घ्यावा : गोरे

चास, ता. २९ : विद्यार्थ्यांनी स्वतःला घडवण्यासाठी कष्ट करण्याची गरज असून शिस्त, जिद्द, प्रामाणिकपणा आदी गुणांनी आपल्या आयुष्याला आकार द्यावा. विद्यार्थ्यांनी ग्रामविकासात स्वतःहून सहभागी व्हावे, असे आवाहन आमदार सुरेश गोरे यांनी बहिरवाडी (ता. खेड) येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबराव बुट्टे पाटील महाविद्यालय यांच्या वतीने विशेष श्रमसंस्कार शिबिर बहिरवाडी येथे २१ ते २७ डिसेंबरदरम्यान झाले. शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी शिबिरार्थींनी ग्रामस्वच्छता, वृक्षलागवड, सौरंग्या मंदिर व शाळा परिसर तसेच ठाकरवाडी व स्मशानभूमीची स्वच्छता केली. दशरथ वाघुले, अंकुश राक्षे, डॉ. सुधीर भालेराव, डॉ. संजय शिंदे, एकनाथ शिंदे, डॉ. अविनाश कोहिनकर, सागर कोहिनकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अश्विनी कदम हिने कीर्तन सादर केले.

या वेळी भगवान पोखरकर, बाबाजी काळे, अंकुश राक्षे, राहुल आंधळे, शिवाजी वर्वे, डॉ. श्रीकांत फुलसुंदर, नाना टाकळकर, डॉ. एस. बी. पाटील, डॉ. संजय शिंदे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. कैलास पाचारणे, प्रा. नीता डोंगरे, प्रा. दिलीप मुळूक, यांसह जगन्नाथ राक्षे, छाया शेळके व ग्रामस्थ उपस्थित होते. उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून विशाल बांदल, प्रतीक्षा उतर्डे, प्रगती उतर्डे, कोमल राक्षे यांना गौरवण्यात आले. आभार प्रा. योगेश वाळुंज यांनी मानले.



पाडळी काळेचीवाडी (ता. खेड) : डोंगरावरील श्री सौरंग्या मंदिर परिसरात शिबिरार्थींनी स्वच्छता करून अकरा पोती कचरा गोळा केला. या वेळी मंदिर परिसरात मान्यवरांसमवेत विद्यार्थी.

पुढारी | पुणे, सोमवार
२४ डिसेंबर २०१८



बहिरवाडीत श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवर.

## बहिरवाडीत 'रासेयो'चे श्रमसंस्कार

चास : हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयातर्फे बहिरवाडी (ता. खेड) येथे राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिर घेण्यात आले. याचे उद्घाटन शुक्रवारी (दि. २१) संस्थेचे अध्यक्ष देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. हे शिबिर गुरुवार (दि. २७) पर्यंत असून, यात स्वच्छता अभियान, शिवारफेरी, श्रमदान, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. पंचायत समिती सदस्य अंकुश राक्षे, संचालक बाळासाहेब सांडभोर, सरपंच जगन्नाथ राक्षे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, डॉ. शिल्पा जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, उपसरपंच छाया शेडाणे, कार्यक्रम अधिकारी मच्छिंद्र मुळुक, योगेश वाळुंज, निता डोंगरे आदी उपस्थित होते.

लोकमत पुणे, सोमवार, दि. ३१ डिसेंबर २०१८

## बुट्टेपाटील महाविद्यालयाचे हिवाळी शिबिर

### बहिरवाडीत आयोजन : विद्यार्थ्यांनी केली गावाची स्वच्छता

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : हुतात्मा राजगुरु महाविद्यालय आणि साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिर बहिरवाडी (ता. खेड) येथे उत्साहात झाले. सक्षम युवा व समर्थ भारत अभियान अशी संकल्पना असलेल्या शिबिरात दोन्ही महाविद्यालयांच्या मिळून २०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, पंचायत समिती सदस्य अंकुश राक्षे, सरपंच जगन्नाथ राक्षे, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, प्रबंधक कैलास पाचारणे, डॉ. शिल्पा जगताप उपस्थित होते. अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना, शिबिर म्हणजे योजिलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोचण्याचा मार्ग असून, आयुष्य समृद्धपणे जगण्याचे कौशल्य शिबिरातून मिळत असल्याचे सांगितले.

◆ विद्यार्थ्यांनी श्रमदान करताना गावाची संपूर्ण स्वच्छता, सार्वजनिक जागेत झाडे लावण्यासाठी खड्डे, श्रीक्षेत्र सौरंग्या मंदिर परिसराची स्वच्छता, शाळा परिसर, ठाकरवाडी तसेच स्मशानभूमी परिसराची स्वच्छता केली.

शिबिरातील स्वयंसेवकांना दशरथ वाघुले, अंकुश राक्षे, डॉ. सुधीर भालेराव, डॉ. संजय शिंदे, एकनाथ राक्षे, प्रा. अविनाश कोहिणकर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी अश्विनी कदम हिने कीर्तन सादर केले. सागर कोहिणकर या सर्पमित्र विद्यार्थ्याने 'साप : समज व गैरसमज' या विषयावर माहिती दिली.

शिबिराचा समारोप आमदार सुरेश गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. या वेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, जि.प. सदस्य बाबाजी काळे, पं.स. उपसभापती भगवान पोखरकर, नगरसेवक राहुल आढारी, शिवाजी वर्पे, रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. आमदार सुरेश गोरे यांनी विद्यार्थ्यांना ग्रामविकासात भूमिका घेण्याचे आवाहन केले.

शिबिरातील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून विशाल चांदल, प्रतीक्षा उतर्डे, प्रगती उतर्डे, कोमल राक्षे यांना ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ.एस.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, सल्लागार प्रा. दिलीप मुळूक, कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छींद्र मुळूक, प्रा. योगेश वाळुंज, प्रा. नीता डोंगरे, समिती सदस्य प्रा. रेश्मा राक्षे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा. संदीप थोरात, प्रा. नीलेश वारणे, प्रा.गणेश घुमाळ यांनी केले.

**जनप्रवास**

रविवार, दि. ३० डिसेंबर २०१८

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिराची उत्साहात सांगता

राजगुरुनगर । वार्ताहर

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालय आणि साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर बहिरवाडी (ता.खेड) येथे दि. २१ ते २७ डिसेंबर दरम्यान उत्साहात संपन्न झाले. सक्षम युवा व समर्थ भारत अभियान अशी संकल्पना असलेल्या शिबिरात दोन्ही महाविद्यालयाच्या मिळून सुमारे २०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.



शिबिराचे उद्घाटन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, पंचायत समिती सदस्य अंकुश राक्षे, सरपंच जगन्नाथ राक्षे, प्राचार्य डॉ. एस.बी.पाटील, डॉ.शिल्पा जगताप उपस्थित होते. अॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना शिबिरे म्हणजे योजिलेल्या उद्दिष्टांपर्यंत पोचण्याचा मार्ग असून आयुष्य समृद्धपणे जगण्याचे कौशल्य शिबिरातून मिळत असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी या शिबिराच्या माध्यमातून जीवनाला नेमकेपणाची दिशा देण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी श्रमदान करताना गावाची संपूर्ण स्वच्छता, सार्वजनिक जागेत झाडे लावण्यासाठी खड्डे, श्रीक्षेत्र सीरम्या मंदिर परिसराची स्वच्छता, शाळा परिसर, ठाकरवाडी तसेच स्मशानभूमी परिसराची स्वच्छता केली.

शिबिरातील स्वयंसेवकांना दशरथ जाधुले, अंकुश राक्षे, डॉ. सुधीर भालेराव, डॉ. संजय शिंदे, एकनाथ राक्षे, प्रा. अविनाश कोहिणकर यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

विद्यार्थिनी अश्विनी कदम हिने कीर्तन सादर केले. सागर कोहिणकर या सर्पमित्र विद्यार्थ्याने साप : समज व गैरसमज या विषयावर माहिती दिली. शिबिराचा समारोप आमदार सुरेश गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, जि.प.सदस्य बाबाजी काळे, पं.स.उपसभापती भगवान पोखरकर, नगरसेवक राहुल आवारी, शिवाजी वर्पे, रासेयो पुणे जिल्हा समन्वयक डॉ. श्रीकांत फुलसुंदर उपस्थित होते. आमदार सुरेश गोरे यांनी विद्यार्थ्यांना ग्रामविकासात भूमिका घेण्याचे आवाहन केले. स्वतःला घडविण्यासाठी प्रचंड कष्ट करण्याची गरज असून विद्यार्थ्यांनी शिस्त, जिद्द, प्रामाणिकपणा, समर्पण आदि गुणांनी आपल्या आयुष्याला आकार द्यावा असे सांगितले.

उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी आई वडील आपल्या शिक्षणासाठी घेत असलेले कष्ट विद्यार्थ्यांनी न विसरता त्यांचे नाव उज्ज्वल होईल यासाठी प्रयत्न करून यशस्वी होण्याचे आवाहन केले.

या शिबिरातील उत्कृष्ट स्वयंसेवक म्हणून विशाल बांदल, प्रतीक्षा उतळे, प्रगती उतळे, कोमल राक्षे यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. शिबिराचे आयोजन प्राचार्य डॉ.एस.बी.पाटील, उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, सल्लागार प्रा.दिलीप मुळूक, कार्यक्रम अधिकारी प्रा.मच्छिंद्र मुळूक, प्रा.योगेश वाळुंज, प्रा.नीता डोंगरे, समिती सदस्य प्रा. रेश्मा राक्षे, डॉ. प्रभाकर जगताप, प्रा.संदीप थोरात, प्रा.निलेश वारणे, प्रा.गणेश धुमाळ, प्रशासकीय सेवक संतोष मुळूक, प्रबंधक कैलास पाचारणे यांनी केले.

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख